अभ्युदय नगर
सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ (मर्या.)
(नोंदणी क्रमांक : एमयुएम/एमएचएडीबा/एचएसजी/टीसी)१२४९२/सन २००६–२००७)
कार्यालय : समाज मंदीर हॉल, वीर श्रीकांत हडकर मार्ग, अभ्युदयनगर, काळाचौकी, मुंबई – ४०० ०३३.

जा. क्र. : ४६/२०१६-२०१७ दिनांक : २७.०५.२०१६

प्रति,

**मा. सन्मानीय अभ्युदयनगर रहिवाशी,**

स.न.वि.वि.

आपणां सर्वांना ज्ञात आहेच की, अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांचा संघ मर्या. हा नोंदणीकृत संघ आहे व सदर संघाचे अभ्युदयनगरमधील ४७ गृहनिर्माण संस्था सभासद आहेत.

इमारतीच्या एकत्रित पुनर्विकासाकरीता सहकार विभागाने बनविलेली मार्गदर्शक नियमावली कलम ७९अ वर्ष २००९ अन्वये संघाने त्यांच्याशी संलग्न असलेल्या ४७ संस्थांच्या पुनर्विकासासाठी दिनांक १२.१०.२०१४ रोजी चार विकासकांच्या निविदा शॉर्ट लिस्ट केलेल्या होत्या.

दिनांक ०१.११.२०१५ पर्यंत अभ्युदयनगरमधील ३१ संस्थांनी मा. उपनिबंधक, सहकारी संस्था म्हाडा, मुंबई यांनी नियुक्त केलेल्या प्राधिकृत अधिकाऱ्याच्या उपस्थितीत विशेष सर्वसाधारण सभा संपन्न करुन २६ सहकारी गृहनिर्माण संस्थांनी मे. किस्टोन रिॲलटर्स प्रा.लि. या विकासकाची इमारतीच्या पुनर्विकासाकरीता निवड केलेली आहे. तर ४ संस्थांनी मे. ऑरनेट हौसिंग प्रा.लि. **(S.P.V.)** यांची विकासक म्हणून निवड केलेली आहे. तसेच एका सहकारी गृहनिर्माण संस्थेची सभा गणपूर्ती अभावी तहकूब करण्यात आलेली आहे.

उर्वरित १६ सहकारी गृहनिर्माण संस्थांपैकी काही संस्थांनी मा. उपनिबंधक सहकारी संस्था म्हाडा यांच्याकडे विकासक निवडीची बैठक आयोजित करण्याकरीता धारीण्या सादर केलेल्या आहेत व त्यावरील कार्यवाही प्रलंबित आहे.

याबाबत ही संघाने मा. उपनिबंधक सहकारी संस्था यांना प्रलंबित असलेल्या संस्थांची प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढणे बाबत दि. २७-५-२०१६च्या पत्रान्वये विनंती केलेली आहे. सदर पत्राची प्रत आपल्या माहितीकरीता सोबत जोडलेली आहे.

अभ्युदयनगरमधील संकल्पसिद्धी को.ऑ.हौसिंग सोसायटी लि. इमारत क्र. २० या संस्थेने दिनांक ०८.०३.२०१६ रोजी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांचेकडे अर्ज करुन विनंती केली आहे की, निविदेच्या अटी-शर्तीनुसार बहुमताने म्हणजेच एकूण २६ सहकारी संस्थांनी विकासक म्हणून मे. किस्टोन रिॲल्टर्स प्रा.लि. या विकासकाची निवड केलेली असूनही संघ अभ्युदयनगरच्या विकासकाचे नियुक्तीबाबत आवश्यक ती कार्यवाही करत नाही.

सदर विनंती अर्जाची छाननी करण्याकरीता मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था यांनी पुनर्विकासाशी संबंधित संघ, संस्था, विकासक व शासकीय यंत्रणा यांना त्यांचे मत मांडण्याकरीता सुनावणी आयोजित केलेली होती. सुनावणीदरम्यान सर्व पक्षकारांची बाजू समजावून घेतली तसेच मा. शहर दिवाणी न्यायालय व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे न्यायनिवाडे विचारात घेऊन तसेच अभ्युदयनगरच्या रहिवाशांची पुनर्विकासाबाबतची गरज व उत्सुकता लक्षात घेऊन मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी दिनांक ०२.०५.२०१६ रोजीच्या पत्रान्वये अभ्युदयनगर सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या संघास अभ्युदयनगरच्या पुनर्विकासाकरीता निविदेतील अटी व शर्तीनुसार विकासकास नियुक्तीचे मंजूरी पत्र देणेबाबत सुचित केलेले आहे. सदर पत्राची प्रत आपल्या माहितीकरीता सोबत जोडलेली आहे.

मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था यांचे दिनांक ०२.०५.२०१६च्या पत्रावर कायदेशीर सल्लागार ॲड. श्री. आप्पासाहेब देसाई यांनीही त्यांचा सल्ला दिनांक २६.०५.२०१६ च्या पत्रान्वये संघास दिलेले आहे.

थोडक्यात कायदेशीर सल्लागार ॲड. श्री. आप्पासाहेब देसाई यांनी त्यांचा सल्ला दिला आहे की, संघाने विकासक निवडीच्या प्रक्रियेकरीता दिनांक ०६.०७.२०१६ पर्यंत जी मुदत दिलेली आहे. त्या मुदतीत उर्वरित संस्थांनी आपली विकासक निवडीची प्रक्रिया पूर्ण करावी. तोपर्यंत विकासकास नियुक्ती पत्र देणे योग्यतेचे ठरणार नाही.

तसेच निविदा प्रक्रियेमधील १ विकासक मे. ओमकार रिॲल्टर्स व डेव्हलपर्स प्रा.लि. यांनीही त्यांचे दिनांक १६.११.२०१५च्या पत्रान्वये निविदा प्रक्रियेस मुदत वाढ देण्यास विरोध केलेला आहे. त्याची ही प्रत सोबत आपल्या माहितीसाठी सोबत जोडत आहे.

वरील सर्वबांबीचा विचार करता यापुढे विकासक निवडीच्या प्रक्रियेस मुदतवाढ देता येणे शक्य होणार नाही याची कृपया नोद घ्यावी.

अशा परिस्थितीत उर्वरित १६ संस्थांच्या सभासद व पदाधिकार्यांनी पुनर्विकास प्रक्रियेकरीता विकासक निवडीची प्रक्रिया दिनांक ०६.०७.२०१६ पर्यंत पूर्ण करावी अशी कळकळीची नम्र विनंती आहे.

आपला विश्वासू,

( जयसिंग भोसले )
सरचिटणीस